# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

सकाळ

---

**दिनांक १९.०३.२०२३ रविवार**

**(गुन्हे)**

**१) नागपूर शहर पोलीसांची दारुबंदी, जुगार, ड्रंकन ड्राईव्ह कायदा अंतर्गत करण्यात आलेली कारवाई :**

नागपूर शहर पोलीसांनी नागपूर शहरातील पोलीस ठाणे हद्दीत मु.दा.का. अन्वये ०१ केस मध्ये एकुण ०१ ईसमावर कारवाई करून रू ८७५/— चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. जुगार कायदा अन्वये ०१ केसेस मध्ये एकुण ०१ ईसमावर कारवाई करून रू १४,९३५/— चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये विविध कलमांखाली एकुण २,९२५ वाहन चालकांवर कारवाई केली. व एकूण रू. ३,३६,९००/— रू तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून या पुढेही कारवाई प्रभावीपणे करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहनासंबंधी नियम पाळुन सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) पोलीस ठाणे अजनी. : — चोरी करणारे आरोपी विरूध्द गुन्हा दाखल**

दिनांक १८.०३.२०२३ चे १२.०० वा. ते १२.३० वा. चे दरम्यान पो. ठाणे अजनी हद्दीत, कंजुलालपेठ मानवता शाळेजवळ गल्ली नं. ०१ अजनी, नागपुर येथे राहणारे फिर्यादी विलास फत्तुजी गजभिये वय ४७ वर्ष, हे कुरियर देण्याचे काम करीत असुन त्यांनी त्यांची महींन्दा कंपनीची गाडी ज्यामध्ये ५ पार्सल चे बॉक्स ठेवले होते ती घरासमोर उभी करून जेवन करण्यासाठी घरी गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरटयाने त्यांचे गाडीवरील पाच पैकी एक पार्सल बॉक्स ज्यामध्ये लॅपटॉप किंमती १,००,०००/रू चा तो पार्सल बॉक्स चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पो.ठाणे अजनी येथे मसपोनि मोहारे मॅडम ९८२२९३०१०५ यांनी अज्ञात आरोपी विरूध्द कलम ३७९, भादवि अन्वेय गुन्हा दाखल करून आरोपीचा शोध घेत आहे.

**(अंकुश राठोड)**
**पोलीस उप निरीक्षक**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी**
**नागपूर शहर**